निगराणी

# केळीवरील करपा रोगाचे नियंत्रण

**अंकित खेडीकर**
सहायक प्राध्यापक
श्री सेवकभाऊ वाघाये पाटील
कृषी महाविद्यालय केसलवाडा वाघ,
जि. भंडारा
**नीलिमा गोबाडे**
**गौरव घोरमाडे**
(पीएच.डी. स्कॉलर)
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ,
परभणी











महाराष्ट्रात केळीची लागवड मोठ्या प्रमाणावर होते. चांगला फायदा मिळवून देणारे पीक म्हणून, आजपावेतो येथे ८२००० हजार हेक्टर क्षेत्र केळी लागवडीखाली आले आहे. मात्र राज्यात १९९५ पासून कमीअधिक प्रमाणात या पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव होत असून, आता बहुदा दरवर्षी या रोगामुळे पिकाचे नुकसान होते. करपा आटोक्यात ठेवण्यासाठी करायची उपाययोजना या लेखात दिली आहे.

महाराष्ट्रात केळी पिकाखाली ८२ हजार हेक्टर इतके क्षेत्र असून त्यातील नांदेड व परभणी जिल्ह्यांत जवळ जवळ ३०,००० हेक्टरवर केळी पीक घेतले जाते. इ.स. १९९५ मध्ये महाराष्ट्रात केळी पिकावर करपा (सिगाटोका) या रोगाचा प्रादुर्भाव सर्वप्रथम आणि मोठ्या प्रमाणात आढळून आला. तेव्हापासून प्रत्येक वर्षी या रोगाचा प्रादुर्भाव कमी-अधिक प्रमाणात शेतकऱ्यांच्या केळी बागांवर होत असून केळी लागवड संकटात सापडण्याची शक्यता आहे.

केळी पिकावर करपा रोग येऊ नये म्हणून खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना केली तर बऱ्याच प्रमाणात या रोगापासून होणारे नुकसान टाळता येऊ शकते.

१) केळीची लागवड ओढे, नदी, नाले यांच्या काठावरील व चिबड जमिनीत करू नये. २) केळीची लागवड शक्यतो जूनच्या पहिल्या पंधरवड्यातच करावी. ३) केळी लागवडीसाठी वापरण्यात येणाऱ्या कंदाचे वजन ७५० ग्रॅम ते १ किलो वजनाचे, शंकू आकाराचे, ३ ते ४ महिने वयाचे व ज्याची पाती तलवारीच्या पात्यासारखी अरुंद असतील अशा मुनव्यापासून घ्यावीत. ४) केळी लागवडीपूर्व कंद कार्बेन्डाझिम (बाविस्टिन) ५० डब्लू.पी. ०.१ टक्के तसेच मोनोक्रोटोफॉस १० मि.लि./ १० लिटर पाणी या प्रमाणात घेऊन त्यामध्ये अर्धा तास बुडवून नंतरच लागवड करावी. ५) नत्रयुक्त खताच्या मात्रा अधिक प्रमाणात व सहा महिन्यानंतर देऊ नयेत. ६) केळी लागवडीनंतर मुनवे तसेच केळीतील रोगग्रस्त व पिवळट पाने काढून त्याची योग्य ती विल्हेवाट लावावी व केळी तणरहित ठेवावी. ७) जास्तीचे पाणी निचरून जाण्यासाठी बागेत चाऱ्या काढाव्यात.

## करपा रोगाची लक्षणे

१) केळीच्या खालच्या पानांवर लहान-लहान पिवळसर लंबगोलाकार ठिपके दिसून येतात. हे पिवळे ठिपके ३ ते ४ मि.मी. लांब व १ मि.मी. रुंद आकाराचे असतात. कालांतराने ह्या ठिपक्यांची वाढ होऊन ते तपकिरी काळपट रंगाचे होतात. अशा पूर्ण वाढ झालेल्या लंबगोलाकार ठिपक्यांची लांबी १२-१५ मि.मी. व रुंदी २.५ ते ३.० मि.मी. एवढी असते.

२) शेवटी ठिपके मध्यभागापासून राखाडी रंगाचे होऊन त्यांच्या कडा काळपट रंगाच्या होतात आणि पाने करपण्यास सुरवात होते व झाडाच्या कार्यक्षम पानांची संख्या कमी होते.

३) परिणामी घडांची वाढ खुंटते व घडांवरील फळे आकाराने लहान राहून त्यातील गर अकाली पिकण्यास सुरवात होते.

## प्रसार असा होतो

पर्जन्यमानात झालेली वाढ, सतत पडणारा पाऊस, हवेतील सापेक्ष आर्द्रता वाढल्यामुळे व पाण्याचा योग्य निचरा न झाल्यास, मशागतीस कमतरता आणि परिसरात किंवा सभोवतालच्या भागातील वातावरणात रोगाचे बिजाणू असल्यास या रोगाचा प्रसार वेगाने होण्यास मदत होते. या रोगाचा प्राथमिक प्रसार हवेद्वारे, लैंगिक बिजाणूंद्वारे होतो. तसेच बागेमध्ये दुय्यम प्रसार अलैंगिक बिजाणूंद्वारे जोराचा वारा किंवा पावसाच्या थेंबांद्वारे होतो.

## रोगनिर्मितीस अनुकूल हवामान

या रोगाच्या बुरशीच्या वाढीस उष्ण व आर्द्रतायुक्त हवामान अतिशय अनुकूल असते. या रोगाचा प्रादुर्भाव जास्त करून पावसाळ्यात उष्ण तापमान २१ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त असेल तेव्हा उद्भवतो.

**नियंत्रण** : १) रोगग्रस्त पानांचा नायनाट : रोगाची प्राथमिक लक्षणे म्हणजे बारीक व तपकिरी ठिपके पानांवर दिसू लागताच पाने कापून नष्ट करावीत. रोगग्रस्त पानांचा किंवा झाडाचा कोणताही भाग बागेजवळ ठेवू नये.

२) केळी कंद प्रक्रिया : लागवडीसाठी वापरण्यात येणारे कंद ७५० ते १ किलो वजनाचे घेऊन त्यांची छाटणी करून स्वच्छ करावेत तसेच कंद १० ग्रॅम बाविस्टीन/१० लिटर पाण्याचे द्रावण करून त्यामध्ये अर्धा तास बूडवून काढावेत व त्यानंतर कंदाची लागवड करावी.

३) बुरशी नाशकाचा वापर

अ) केळी लागवड झाल्यानंतर ४-५ आठवड्यांनी कार्बेन्डाझिम (बाविस्टीन ५० डब्लू.पी.) १० ग्रॅम/१० लिटर पाण्याचे द्रावण करून २०० ते २५० मि.लि. प्रतिझाडप्रमाणे आळवणी करावी.

ब) करपा रोगाचा प्रादुर्भाव पावसाळ्यात तसेच इतर वेळी वातावरणातील बदलांमुळे जास्त होत असल्यामुळे केळी लागवडीनंतर ४-५ आठवड्यांनी प्रोपिकोन्याझोल (टील्ट २५ ई.सी.) ५ मि.लि. प्रति १० लिटर पाणी किंवा कार्बेन्डाझिम (बाविस्टीन ५० डब्लू.पी.) १० ग्रॅम/१० लिटर पाणी या प्रमाणात द्रावण करून १५ दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून फवारण्या करण्यात याव्यात.

## हे लक्षात ठेवा

१) पॉवर स्प्रेचा वापर केल्यास औषधांची मात्रा तिपटीने वापरावी.

२) प्रत्येक फवारणीच्या वेळेस स्टिकर (सॅन्डोव्हिट) १० मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ■